महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमी
दूरध्वनी : ०२२ - २२६७२५३९
ई - मेल : mhsahityaacademy@gmail.com
ओल्ड कस्टम हाऊस, विकास विभाग इमारत, दुसरा मजला,
शहिद भगतसिंह मार्ग, मुंबई - ४०० ००१.

## (ड) गुजराती अकादमीमार्फत आयोजित कार्यक्रमाबाबतची नियमावली.

### १. लोकसाहित्य डायरा :-

महाराष्ट्रात ज्या शहरांमध्ये गुजराती समाजाची मोठया प्रमाणात वस्ती आहे, अशा शहरांमध्ये गुजराती लोकसाहित्य डायरा किंवा कवीसंमेलन अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल प्रत्येक वर्षी ४ शहरांची अकादमीच्या कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये निवड करण्यात येईल व तेथे लोकसाहित्य डायरा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल. प्रत्येक कार्यक्रमासाठी रु.२.०० लाख इतक्या मर्यादेपर्यंत खर्च करण्यात येईल. त्यामुळे या प्रयोजनासाठी एकूण रु. ८.०० लाख इतका खर्च करण्यात येईल. अकादमीच्या कार्यकारी समितीच्या बैठकीत शहरांची नावे अंतिम झाल्यानंतर खर्चाच्या बाबवार सविस्तर प्रस्तावास शासन मान्यता घेउन त्यानंतर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

### २. प्रुफरिडींग व शुध्दलेखन कार्यशाळा :-

गुजराती भाषा शुध्द स्वरुपामध्ये लिहितावाचता यावी, या उद्देशाने अकादमीमार्फत प्रतिवर्षी सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात येईल. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी अकादमी साहित्य क्षेत्राशी संबंधित नोंदणीकृत संस्थेच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करील. नोंदणीकृत संस्थेची निवड ही अकादमीच्या कार्यकारी समितीच्या मान्यतेने करण्यात यावी. यासाठी कमाल रु १.०० लाख इतका खर्च करण्यात यावा व याबाबतच्या खर्चाच्या बाबवार सविस्तर प्रस्तावास शासन मान्यता घेऊन त्यानंतर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

### ३. महिला साहित्य सेमिनार :-

महिलांमध्ये गुजराती साहित्याबद्दलची जागृती निर्माण करण्यासाठी अकादमीमार्फत महिला साहित्य सेमीनार आयोजित करण्यात येईल. या प्रयोजनासाठी अकादमी साहित्य क्षेत्रासाठी संबंधित महिला संघटनेच्या नांदणीकृत संस्थेचे सहकार्य घेऊ शकेल. नोंदणीकृत संस्थेची निवड ही अकादमीच्या कार्यकारी समितीच्या मान्यतेने करण्यात यावी. यासाठी कमाल रु. २.०० लाख इतका खर्च करण्यात यावा व याबाबतच्या खर्चाच्या बाबवार सविस्तर प्रस्तावास शासन मान्यता घेऊन त्यानंतर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.